# ॥ मनो विद्या ॥



God's Friend

कीर्ती-कन्या

Scanned by CamScanner

# मनोविद्या



God's Friend

कीर्ती - कन्या

Scanned by CamScanner

# श्री चरणी अर्पण

## स्तवन

स्वरूप सुंदर रूप गणेशाचे
मन मोहवी याचे किती गुण गावे ।।धृ।।
कथा आहे न्यारी याच्या जन्माची
प्रगटिला तेथूनी जे वर्ज्यले उमेने ।।१।।
घालुनी प्रदक्षिणा मातेच्या भोवती
दाखवे विश्‍व खरे बालकाचे ।।२।।
लघु नेत्र अन महा कर्ण याचे
सुक्ष्म निरखूनी ऐकतो सर्वांचे ।।३।।
मुख लपले हे लंब नासिकेने
मौन राहुनिया ओळखी गंधाने ।।४।।

God's Friend

विद्येचा हा देव, व्यासाचा लिपीक
मस्तक झुकते अती लीनतेने ।।५।।
महाकाय देई मुषका शरण
धरूया चरण दयेच्या देवाचे ।।६।।
लंबोदर आहे क्षमाशील देव
सुधारूनी घेई, अपराध भक्तांचे ।।७।।
गरजे आधी देई दान भक्तास
याच्यापाशी काही मागावे ना लागे ।।८।।
इच्छापूर्ण करी सर्व मनाच्या
लीलया कंठते जीवन भक्ताचे ।।९।।
देवाधिपती असा हा देव
आपोआप कर जुळती अमुचे ।।१०।।
कीर्ती कन्या जयाला, देऊन दृष्टांत
दिला पुनर्जन्म, सदा गावूया स्तवन ।।११।।

Scanned by CamScanner

# मनोगत

सद्य परिस्थितीचे परिवर्तन
धरतीचा करी स्वर्ग
सुख शांती समाधान समृद्धी
सर्व काही वसे मनी

अविरत बहर येण्यासाठी
कर्म - अकर्मातील भेद कळण्यासाठी
विचार काव्याचे हे पुष्प
संसार - सागराचे दीपस्तंभ

विश्वबाग बहरण्याचा
स्वमनापासून श्रीगणेशा
जीवन सुलभ आचार हे
मनो विद्या कीर्तीकन्येचे

God's Friend



Scanned by CamScanner

१

मन बेभान बेभान
कधी गगनी भुईवर
काही सांगता ऐकेना
फार चंचल अस्थिर

God's Friend

२

मन फिरे कुठे कुठे
देहदृष्टी न पोचे जिथे
वाटा साऱ्या ठाव्या ह्यास
अनोळखी ज्या पावलांस

३

मनाची शक्ती अपार
करे असंख्य विचार
नाही फायदा तयाचा
जोवर न उतरे भुवर



Scanned by CamScanner

४

दुःख राईपेक्षा छोटे
तरी मावेना मनात
अश्रूवाटे बाहेर पडे
होई भावनांचा उद्वेग

God's Friend

५

सुख आभाळाहून मोठं
मनी उरे जागा राहून
वाढते हे तेव्हाच
जेव्हां मिळते सर्वांस

६

मन पाहे ते स्वप्नी
कष्ट न घेता काही
कठीणच ते नसती
अशक्यप्राय जगती



Scanned by CamScanner

७

माझं मन ते मन
दुसऱ्याचं आहे पाषाण
सख्याशीही असं वागणं
जसं शत्रूशीही नसावं

God's Friend

८

समजे स्वतःला महान
दुसऱ्याला तुच्छ लेखून
आणि स्वतःच्याच नजरेत
नकळत होते लहान

९

दुसऱ्याच्या मदतीची
सदा अपेक्षा करून
मना स्वतःला कधी
नको लेखू हीन



Scanned by CamScanner

१०

दुसऱ्याचा स्वार्थ
नाही तुला पाहवत
मग तू स्वतःचाच
सांग कसा पाहतोस

God's Friend

११

कशाला करतोस
मत्सर दुसऱ्याचा
देई जे आमंत्रण
तुझ्याच दुःखाला

१२

टाळतं मन पापास
घाबरूनी दुसऱ्यास
नकळत स्वतःशीच
प्रतारणा करीत



Scanned by CamScanner

१३

हेवेदावे ठाव ह्यास
कसे फसवावे दुसऱ्यास
तेव्हां हे विसरतं
सव्वा मिळतं शेरास

१४

वागावे कसे दुसऱ्यांनी
असे वाटे आपुल्याशी
विचार कर मना तुची
तसाच वागतो का त्याच्याशी

१५

लोकां शिकवे तत्वज्ञान
स्वतः कोरडे पाषाण
का नाही तू करत
तत्वज्ञानाने आचरण

God's Friend



Scanned by CamScanner

१६

मानअपमानाच्या गोष्टी
मोठेपणाने करती
खूप बढाया मारूनी
स्वसत्वास मागे ठेवती

१७

देव देव करीत
पशू बनतो माणूस
माणुसकीस करून भग्न
राहतो पुजेतच मग्न

१८

वाटे सेवा करून घ्यावीशी
दुसऱ्याकडून स्वतःची
पण फूल पुजिता दगडांनी
काय होईल परिणामी



God's Friend
Scanned by CamScanner

१९

स्वतःचाच हेका
चालवूं नको सदा
समजून घे दुसऱ्यांनाही
असतात भावना

God's Friend

२०

तुझ्या स्वातंत्र्याची सीमा
संपते तिथेच
दुसऱ्यांचा हक्कभंग
होतो जिथेच

२१

स्वतः शब्द देऊन
जर नाही तू पाळत
मग तुज का खंत
दुजा नाही ऐकत



Scanned by CamScanner

२२

कुणाच्याही मागे
त्याची न करावी निंदा
दोषगुण ज्याचे त्याचे
त्याच्या समोर वदा

God's Friend

२३

असावे असे वर्तन
जे असे तुला प्रिय
पण राहू द्यावे लक्ष
न होईल कोणी भक्ष

२४

काम कधी आपुले
दुसऱ्यांना सांगू नये
कार्य ते आपुले
अर्धवट सोडू नये



Scanned by CamScanner

२५

धन आणि संपत्ती
आहे माणसांच्या सेवेशी
नको मानू श्रेष्ठ हिस
माणसाहून अधिक

God's Friend

२६

व्हायचे जर संत
तर वाणी ठेव गोड
नाही दुखणार मन
चुकून कधी कोणाच

२७

व्हायचे जर संन्यासी
नाही महत्वाची वाणी
कडू असले तरीही
असू दे सत्यच वचनी



Scanned by CamScanner

२८

जशास तसे वागणे
म्हणून दुष्टाशी वाईट
मना सांग मग
काय फरक दोघांत

२९

वृक्ष देई सावली
माळी असो वा मारेकरी
वाग चांगले तसाची
सुज्ञाशी वा दृष्टाशी

३०

मना तुझ्या रागाचा
उगम मूर्खपणात
होईल त्याचा अंत
मग पश्चातापात

God's Friend



Scanned by CamScanner

३१

सवयी आणि स्वभाव
तूही बदलशील
जर पक्का स्वतःशीच
निर्धार करशील

३२

आधी सुधार स्वतःला
मग तुझ्या घराला
गावानंतर तुझ्या
सुधार मग विश्वाला

God's Friend

३३

दगड होई देव
नको ते वर्ज्यून
मना तूही होशील
टाकून सारे दुर्गुण



Scanned by CamScanner

३४

नाही गरज मुहूर्ताची
कोणत्याही सत्कार्यासाठी
कर तू कार्यास आरंभ
होईल तोच शुभमुहूर्त

God's Friend

३५

आहेत अनेक सद्मार्ग
तरी वेळ करू नको व्यय
तर्क-वितर्कात व्यर्थ
नाहीतर घडेल अनर्थ

३६

नाही जाणार वाया
कधीही तुझे सत्कार्य
एक दाणा पेरला तर
मिळतील तुला हजार



Scanned by CamScanner

३७

सहानुभूतीच्या शब्दापेक्षा
आहे क्षुद्र कर्म महान
बोलणारे असती लाख
पण एकटा तू करणार

३८

आजाऱ्याची सेवा
हीच देवाची पूजा
नाही पुण्यकर्म दुजे
ह्याहुनी रे मोठे

३९

माणूसकीपेक्षा मोठा
नाही धर्म कोणता
जर तू तो मानला
ठरशील मनाने खोटा

God's Friend



Scanned by CamScanner

४०

तेव्हाच करावी मदत
जेव्हां भासे गरज
मेल्यानंतर अमृत
उपयोगी आहे काय ?

४१

दान असे करावे
उजव्याचे डाव्यास न कळावे
पुण्याईची अपेक्षा न करता
करूनी दान विसरावे

४२

करावे दान त्यास
निकड आहे ज्यास
ज्योड्याची रे लंगड्यास
काय आहे गरज

God's Friend



Scanned by CamScanner

४३

पुण्याईच्या लालसेने
सत्कार्य कधी करूं नये
तरी मना आपण कधी
सत्कार्य करणे सोडू नये

४४

नको मना करूस
कधी कुणावर उपकार
कर ते तू कर्म
समजून स्वतःचे कर्तव्य

४५

तुझे हे दुर्गुण
देतील तुज दुःख
रहा मग एकटाच
बस रडतच फक्त

God's Friend



Scanned by CamScanner

४६

नको लेखूस हीन
कधी तू स्वतःस
ह्याचा अर्थ स्वपायावर
तूच मारतोस कुऱ्हाड

४७

नको करूस प्रेम
कधी स्वतःच्या नावावर
शेवटी ते फक्त आहे
तुझी दुसऱ्यांना ओळख

४८

नको बोलूंस खोटं
जरी कारण मोठं
शेवटी होतो नेहमीच
सत्याचाच विजय

God's Friend



Scanned by CamScanner

४९

नको करू सहन
तू कधी अन्याय
आहे अपराधी मोठा
दुष्टापेक्षा सहनशील

५०

नको तू करूस
सौंदर्याचा गर्व
नको तू भुलूस
हे निसर्गाचे कर्म

५१

नको राग क्रोध
कुणाचा कधीच
त्यात होई सर्वनाश
एकट्याचा तुझाच

God's Friend



Scanned by CamScanner

५२

नाही काही कामाची
तुझी चंचलता इतकी
काळ जरी प्रवाही
स्थिर त्याची गती

५३

नको होऊस संथ
कधी तू इतका
पुढे जाईल विश्व
मागे तू एकटा

५४

नको मानू आनंदा
जरी पिंजरा सोन्याचा
स्वातंत्र्यावर घाली गदा
ह्या पारतंत्र्याच्या बेड्या

God's Friend



Scanned by CamScanner

५५

नाही काही कामाचं
एवढ्या गांभीर्याने जिणं
ज्याने तू हसण्याचं
रहस्य विसरशील

५६

नको ते जिणे
जे असे लाचारीचे
बरे त्यापेक्षा मरणे
जे असे अभिमानाचे

५७

नाही बसत माशी
खोट्या फुलावर कधी
मग कारे मना तूची
खोट्याला साथ देशी

God's Friend



Scanned by CamScanner

५८

नाही कोणी असत
कधी सर्वगुणसंपन्न
नसलेल्याचा करूनी खेद
नको करू गुणांचा अनादर

५९

नाही धुतले जाणार पाप
गंगाजमुनाच्या पाण्याने
पश्चातापाच्या अश्रूशिवाय
त्यास दुसरा नसे उपाय

६०

नाही चालत सारखे
वैभव अपुल्या संगे
म्हणून मना चाल
तूच जगाच्या संगे

God's Friend



Scanned by CamScanner

६१

नाही सापडणार शोधूनी
तुला सुख या जगी
नीट बघ निरखुनी
आहे तुझ्याच हृदयी

६२

नाही श्रेष्ठ कोणीही
आहे या जगती
जाण्या-येण्या नंतर आधी
सुरळीत विश्व व्यवहार चालती

६३

ज्याची त्याची महती
असे अपुल्या जागी
नसे श्रेष्ठ कोणीही
नसे कनिष्ठ कोणीही

God's Friend



Scanned by CamScanner

६४

आपापल्या कर्माने
होई जो तो लहानथोर
वेळ अथवा हे विश्व
संधी साथ देवो न देवो

६५

यश नसू दे अंतिम ध्येय
कधी तुझ्या जीवनाचे
ती राहु दे एक पायरी
एक क्षण विसाव्याची

६६

आहे त्यात समाधान
मना सतत मानू नको
प्रगतीच्या पायरीला
तू शिखर म्हणूं नको

God's Friend



Scanned by CamScanner

६७

कोणत्याही यशाला
जीवनाचे शिखर मानले तर
आयुष्याच्या उतरणीला
होईल तेच कारण खरं

६८

विजयाची आशा
सोडलीस तर
युध्दाच्याच आधी
होईल तुझी हार

६९

करून जर युद्ध
जिंकले तू विश्व
राहील तुझे राज्य
जोवर तुच जिवंत

God's Friend



Scanned by CamScanner

७०

जिंकायचे जर जग
तर कर तू प्रेम
तुझ्या मृत्यूनंतरही जन
घेतील तुझे नाम

७१

चुकतो रे देवही
माणसाला अधू बनवूनी
मग माणसाच्या चुकींवर
नको राग पारावर

७२

माणसाचा शत्रू मोठा
क्रोध आहे हा
आपल्याच माणसाला
बनवे जो परका

God's Friend



Scanned by CamScanner

७३

क्षमा करण्याचा गुण
आहे जगात महान
जो हा करी जतन
त्याचे विश्वाशी मित्रत्व

७४

जर तु स्वतःलाच
बनवशील मित्र
तरच हे विश्व
बनेल तुझे मित्र

७५

कर्मा आधी असते तुला
चांगल्या फळाची अपेक्षा
उधाण येई आनंदा
नुपेक्षी कर्म करता

God's Friend



Scanned by CamScanner

७६

स्वतःस मोठे म्हणूनी
नाही तू होणार
असेल ध्येयप्राप्तीसाठी
हीच तुझी माघार

७७

धर्म हाच देव
कर्म हीच पुजा
मोक्षासाठी जीवनाच्या
हाच मार्ग सोपा

७८

बुद्धीची तहान कधी
शमू नाही द्यायची
वाढ ही प्रगतीची
खुंटू नाही द्यायची

God's Friend



Scanned by CamScanner

७९

ध्येयप्राप्तीसाठी कर
कष्टाचा तू यज्ञ
संधीसहित यश
स्पर्शेल तुझे चरण

८०

कर कर्माच्या देवासाठी
तू पूजा कर्तव्याची
नाही राहणार धास्ती
तुला कधी अपयशाची

८१

पदरी निराशा पडली
अपयशाच्या कारणी
खर तर असे ही
यशाची पहिली पायरी

God's Friend



Scanned by CamScanner

८२

असतं फार सोपं
अपयश पचवणे
कठिण रे तितकेच
यश सातत्याने टिकवणे

८३

आनंदी जन झाले
कारण तुझ्या मृत्यूचे
माणूस म्हणून जगताना
याहून मोठी हार नसे

८४

बोलण्याआधी असतोस
शब्दांचा तू मालक
बोलल्यानंतर होशील
शब्दांचा तू गुलाम

God's Friend



Scanned by CamScanner

८५

ठरवशील ते बोल
बोलशील तसा वाग
तेव्हांच तुझे यश
घेईल पायाशी लोळण

८६

प्रत्येक शब्दाचा
अर्थ आहे मोजका
आहे अनंत अर्थाची
भाषा ही मौनाची

८७

इतिहासावरून कोणीही
नाही शिकत काही
म्हणूनच होते नेहमी
इतिहासाची पुनरावृत्ती

God's Friend



Scanned by CamScanner

८८

नाही शिक्षक मोठा
अनुभवापेक्षा कोणता
तोही माने पराजया
जेव्हा विद्यार्थी अजाणता

८९

अज्ञानात सुख
असते क्षणिक
नाही शत्रू मोठा
ह्याहूनी कोणता

९०

ज्ञानाचा हा खजिना
आहे शाश्वत सुखाचा
मार्गाला लावे संकटा
नाही जायचा चोरीला

God's Friend



Scanned by CamScanner

९१

मिळविलेले ज्ञान वाया
कधी नाही जाणार
आज केलेल्या बचतीचा
उद्या फायदा होणार

९२

नाही तुला ज्ञान
याची नाही जाण
याहूनी नाही महान
जगी कोणतेही अज्ञान

९३

सुज्ञ म्हणे देव
दुष्ट म्हणे भूत
अरे हे सारेच
आहेत मनाचे खेळ

God's Friend



Scanned by CamScanner

९४

संकटमुक्तीचे द्वार
असते आधीच तयार
शोधण्याचा तू फक्त
कर प्रामाणिक प्रयत्न

९५

सहनशक्तीची परीक्षा
दैव घेते दुःख देऊन
ह्यात जो होईल उत्तीर्ण
बनवेल धरतीस स्वर्ग

९६

दुःखामुळे कळेल
सुखाचे महत्व
तेव्हांच उलगडेल
जीवनाचे रहस्य

God's Friend



Scanned by CamScanner

९७

जाण स्वतःच्या मर्यादा
खरेपणाने साऱ्या
बघ मग येते का
नवे दुःख सामोरा

९८

सदा आनंदी राहणे
गोष्ट तुझ्या हक्काची
का करतोस काळजी
अघटित घटनांची ?

९९

करावे तसे भरावे
दैवाचा नियम असे
पापपुण्य तुझे जेवढे
सुखदुःख मिळेल तेवढे

God's Friend



Scanned by CamScanner

१००

गाढवाच्या रे पाठीवर
साखरमातीचे समान-ओझे
मग तू रे का करतोस
सुखदुःखाला वेगवेगळे

१०१

अर्धे भांडे पाण्याचे
नको म्हणू अर्धे रिते
सुखसंतुष्ट त्यात आहे
जर जाणून मानले

१०२

बरी नाही इतकी हाव
हे हवं ते हवं
नाही जे मिळालं तर
दुःखाला होईल कारण नवं

God's Friend



Scanned by CamScanner

१०३

लाथ मारशील तेथे
पाणी काढण्याची हिंमत
मना तू बाळग
आजच्या ह्या जगात

१०४

बिनबुडाची बढाई
मना मारू नको कधी
पुराव्याच्या वेळेस
होईल तुझी फजिती

१०५

करून शक्तीचा गर्व
नको पिडूस दुबळ्यांस
त्यांची युक्ती ठरेल श्रेष्ठ
कराया तुझा सत्यनाश

God's Friend



Scanned by CamScanner

१०६

बोलण्याने नको करूस
शक्तीचा रे अपव्यय
त्यापेक्षा ती वेळ
कर कर्मासाठी व्यय

१०७

विचार न करता
बोलू नकोस कधी
मूर्खपणाशिवाय त्यात
दुसरे ठरे न काही

१०८

कोणतेही काम कधी
अविवेकाने करू नये
पूर्ण बोध झाल्याविना
पुढचे पाऊल टाकू नये

God's Friend



Scanned by CamScanner

१०९

स्वभाव हा उतावळा
करेल सारा घोटाळा
वेळीच घाल आळा
नाहीतर चेहरा होईल काळा

११०

संशयाचे भूत
करे जीवनाचा ऱ्हास
जिवंतपणी तुझा मृत्यू
दिसेल डोळ्यांस

१११

अज्ञानाचा पडदा
दूर कर मना
भितीच्या कारणाला
नको देऊ थारा

God's Friend



Scanned by CamScanner

११२

आहे सर्वात दीन
माणूस धैर्यहीन
धैर्य जरी असे कडू
त्याचे फळ मात्र गोड

११३

रहा प्रामाणिक सदा
स्वतःशी आणि विश्वाशी
नाही वाटणार तुला
कधी भिती कोणाची

११४

गर्व हा चुकीचा
जरी चांगुलपणाचा
कारण त्याची जागा
असे पाऊली सर्वांच्या

God's Friend



Scanned by CamScanner

११५

रहा सदा नम्र
जरी असशी विद्वान
नाही शोभा येत
कधी उद्धटपणास

११६

जरी तू शक्तीवान वा विद्वान
तरी करताना कर्म
हो तू तृणापेक्षा नम्र
आणि वृक्षापेक्षा सहनशील

११७

बुडणारा विंचू चावे
वाचवणाऱ्या साधूस
मरतानाही तो धर्म न सोडे
मग का सोडावा साधूने

God's Friend



Scanned by CamScanner

११८

कशाला मृत्यूचे भय
करताना साहस
जरी तू टाळले साहस
तरी मृत्यू अटळ

११९

भविष्याची चिंता
कशाला करायची
घडणार तेची
जे तू घडवीशी

१२०

जगातील प्रत्येक कोडी
आहेत फार सोपी
पण तुला हवी माहीती
कशी ती सोडवायची

God's Friend



Scanned by CamScanner

१२१

वाचन आणि मनन
विद्या हेची धन
होईल संस्कारित
त्याने तुझे मन

१२२

व्यायामाने शरीर
होईल बलवान
तसेच होईल
संकटाने मन

१२३

सुविचार, सत्कार्य, प्रेम-शांती
तेथे शारदा-रमा वसती
नको मग धास्ती
दारिद्र्याची नसती

God's Friend



Scanned by CamScanner

१२४

यशाची गुरूकिल्ली
आहे ही नम्रता
स्वर्गाचेही दार
बघ ही उघडेल

१२५

राग, द्वेष, मत्सर
तुझे हे शत्रू महान
मना तू ही टिकव
ह्यांचे शत्रुत्व सतत

१२६

सारासार विचारबुद्धी
करेल जीवन सुखी
नाहीतर होशील दुःखी
पायाशी असून संपत्ती

God's Friend



Scanned by CamScanner

१२७

बरी नाही ही धुंदी
स्वतःच्याच बुद्धीची
जी न चाले संकटी
पडे प्राण तोंडघशी

१२८

कोणत्याही गोष्टीसाठी
नको होऊ बेभान
मुकशील तू प्राणालाही
जर गमावला संयम

१२९

विचार करणे सतत
फार आहे कठीण
त्याहूनी आहे सरल
मना कोणतेही कर्म

God's Friend



Scanned by CamScanner

१३०

आहे फार सोपे
मना उपदेश देणे
पण त्याहूनी कठीण
योग्य उपाय सांगणे

१३१

आहे तुझे आयुष्य
फक्त क्षणभंगूर
नको गमावूस वेळ
वादविवादात व्यर्थ

१३२

भलेबुरे कधीही
नसते कशातही
जे असे काही
वसे तुझ्याच नजरी

God's Friend



Scanned by CamScanner

१३३

देई निर्मळ आनंद
जे खरे सौंदर्य
भगवंताचा तेथे वास
हो तू नतमस्तक

१३४

आजचे काम उद्या करू
असे कधी नको म्हणू
आज होईल उद्या येऊन
मूर्ख बनशील संधी गमवून

१३५

तुझी असंतुष्टता
आणि असमाधानता
आहे असफलता
प्रयत्नांची तुझ्या

God's Friend



Scanned by CamScanner

१३६

प्रयत्नांचा आळस
याचा एकच अर्थ
मूर्खपणाचा कळस
अपयशाला आमंत्रण

१३७

चिंतते मन असे कधी
नाही चिंतणार जसे वैरी
प्रगती पथावर आडकाठी
घालणार तू स्वतःचा वैरी

१३८

आयुष्याच्या लढाईत
रहा तू तटस्थ
कोणत्याही संकटास
जा सामोरा सुसज्ज

God's Friend



Scanned by CamScanner

१३९

प्रवाह हा आयुष्याचा
करायचा जर गतीने
चालत रहा सदा
ओळखीच्या वाटेने

१४०

आनंद हा जीवनाचा
नक्की होईल द्विगुणित
जगण्याच्या नव्या वाटा
काढ तू शोधून

१४१

बरा नाही इतका
फाजील आत्मविश्वास
सावधानता होई नष्ट
आणि जीवनाचा ऱ्हास

God's Friend



Scanned by CamScanner

१४२

निरर्थक जीवनाचा
शोध आधी अर्थ
त्याच्यानंतर मग
कर जीवन सार्थ

१४३

जीवन आपुले
असावे उदबत्तीसारखे
स्वतः मंद जळुनी
करे जनजीवन सुगंधी

१४४

खडतर हे जीवन
नाही होणार सुसह्य
आशाविणा तू जर
जगायचे म्हटले तर

God's Friend



Scanned by CamScanner

१४५

हे जीवन नव्हे
रिते करायचे भांडे
हे तर रिते भांडे
कर्मधर्माने भरायचे

१४६

कधी न करण्यापेक्षा
थोडा उशीर बरा
सुकर्म करण्यासाठी
वेळ कोणतीही बरी

१४७

भविष्याची चिंता
नि गतकाळाची आठवण
नको घालवूस वाया
ह्यात आजचा वर्तमान

God's Friend



Scanned by CamScanner

१४८

रात्रीमागून दिवस
असतोच सतत
दुःखाचे हे सावट
क्षणापुरतेच मर्यादित

१४९

चांगल्या आठवणी
ठेवाव्यात जपुनी
वाईट घटना
जाव्यात विसरूनी

१५०

तुझ्या नजरचुकीमुळे
लागेल तुला ठेच
देऊ नको दोष
विनाकारण दैवास

God's Friend



Scanned by CamScanner

१५१

मृत्यू हाच शेवट
आयुष्याचा प्रत्येक
करतोस का रे मग
मालकी हक्काचा वाद

१५२

राजा असो वा रंक
रित्या हाती जगी येई
कमावले जरी कितीही
रित्या हातीच जग सोडी

१५३

वज्रासारखा कठिण
मना होऊ नको कधी
ध्येयप्राप्तीसाठी तू
नका सोडू माणूसकी

God's Friend



Scanned by CamScanner

१५४

विनाकारण तू कधी
स्वतः कष्ट घेत नाही
मग दुसऱ्यांना छळताना
तुला लाज का वाटत नाही ?

१५५

तू कधीही करशील
निजलेल्यास जागे
नाही उठणार कधी
जो ढोंग घेऊन निजे

१५६

आहे खूप तोकडी
लबाडीची चादर
तुला ती संपूर्ण
नाही कधी झाकणार

God's Friend



Scanned by CamScanner

१५७

रहा सदा अलिप्त
मोहाच्या क्षणापासून
कारण आहे ती
पापाची पहिली पायरी

१५८

नसते कधी भिती
खऱ्या निष्ठेला कोणाची
हिच्याशिवाय होत नाही
महान प्रतिभेची निर्मिती

१५९

जर नाही गवसली
तुज चीज चांगली
तरी नाही होणार कमी
त्या वस्तुची महती

God's Friend



Scanned by CamScanner

१६०

नाही ते सर्व महान
जे आहे छान
पण ते सर्व छान
जे आहे महान

१६१

मातीतील सोने
मातीमोलानेच जाणार
भट्टीतील निखाऱ्यातून
जर बाहेर नाही येणार

१६२

दुधातील पाणी
दुधभावानेच जाणार
संताचा हा संग
चढवे जीवनात रंग

God's Friend



Scanned by CamScanner

१६३

प्रशंसेने भुलून
मना तू फसूं नको
हरभऱ्याच्या झाडावर
पडण्यासाठी चढू नको

१६४

वरकड दिसे सर्व सुखी
नीट पाहता नसे कुणी
स्वतःस समजे का तू दुःखी
मना ही तुझी भावना वेडी

१६५

सुख ही गोष्ट
अशी आहे जगात
तुजजवळ नसताना
देऊ शकशील सर्वांना

God's Friend



Scanned by CamScanner

१६६

देवाकडे मागताना
त्यासच सांगावे निवडाया
बघ तो देईल तुला
त्याच्याकडील सर्वोत्कृष्ट

१६७

स्वतःच्या नशीबास खोटे
आपण कधी म्हणू नये
ते तर सदा साथ देत
जरी वेळ भलीबुरी येते

१६८

राजा असो वा रंक
दोघांनाही समान त्रास
मना तू का करतोस
संपत्तीचा अट्टाहास

God's Friend



Scanned by CamScanner

१६९

बघ तो सूर्यदेवही
पाळे नियम काटेकोर
मग तू रे का करतोस
विनाकारण कुरकुर

१७०

वादळ वाऱ्यात
पडते मोठे झाड
नाही काही होत
तिथे नमतं गवत

१७१

कर तू भोजन
घालवाया जीवन
व्यर्थ ते जीवन
जे करे फक्त भोजन

God's Friend



Scanned by CamScanner

१७२

विनोद आणि खेळ
देई चित्तास विश्राम
करी बुध्दी तीक्ष्ण
जर असती निर्मळ

१७३

कृतीशून्य प्रेमाला
नसतं काही मोल
तहानलेल्यास मृगजळाचा
जसा नाही उपयोग

१७४

प्रेमात मानाला
नसते किंमत
मानाचं प्रेम
अर्थशून्य असतं

God's Friend



Scanned by CamScanner